दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे  संपादक बद्रूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ शनिवार दि. 02 ऑगस्ट 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 83 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

# भारतातील बड्या बँकेत ₹50000000000 चा पेपर लोन घोटाळा

पंजाब अँड महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक (PMC) घोटाळ्याप्रकरणी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (RBI) ऑडिट अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. PMC बँकेने 21,000 हून अधिक खोट्या कर्ज नोंदी करून तब्बल ₹5,000 कोटींचे बनावट व्यवहार दाखवल्याचा खुलासा झाला आहे. या घोटाळ्याच्या केंद्रस्थानी असलेल्या आणखी एका गंभीर प्रकरणाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. काय घडलंय नेमकं? सविस्तर जाणून घेऊया.

**काय आहे नेमकं प्रकरण?**

आवास डेव्हलपर्स अँड कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला बँकेने ₹135 कोटींचे कर्ज मंजूर केल्याचे दाखवले होते. मात्र, प्रत्यक्षात कंपनीच्या खात्यात फक्त ₹30 कोटीच जमा झाले. विशेष म्हणजे, बँकेने कंपनीकडून तब्बल ₹170 कोटींची वसुली केल्याचा दावा केला आहे. या दाव्याला कंपनीने बेकायदेशीर आणि खोटा ठरवत बँकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

**ऑडिट अहवालात काय खुलासा?**

चार्टर्ड अकाउंटंट दीपक सिंघानिया अँड असोसिएट्स यांच्या ऑडिट अहवालानुसार, ऑगस्ट 2012 नंतर आवास डेव्हलपर्सच्या खात्यात कोणताही निधी हस्तांतरित झालेला नाही. त्यानंतर बँकेने केवळ व्याजाच्या नोंदी करून कर्जाची फाईल 'सक्रिय' दाखवण्याचा प्रयत्न केला. या

## मोडस ऑपरेंडी ऐकून डोकं चक्रावेल!

बनावट नोंदींद्वारे बँकेने खोटा आर्थिक व्यवहार दाखवल्याचे स्पष्ट झाले आहे.

**कागदोपत्री व्यवहार आणि गहाण मालमत्ता?**

आवास डेव्हलपर्सने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरातील मोठ्या प्रमाणावर मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवल्या होत्या. यानंतर बँकेने कर्जाची मर्यादा अनेकदा वाढवल्याचे दाखवले. मात्र, हे सर्व व्यवहार फक्त कागदांवरच झाले असून प्रत्यक्षात कोणताही निधी कंपनीला मिळाला नाही. या प्रकारामुळे कंपनीला मोठा आर्थिक फटका बसल्याचे त्यांनी सांगितले.

**NCLT मध्ये कायदेशीर लढाईत काय झालं?**

या फसवणुकीच्या आरोपांवर आवास डेव्हलपर्सने PMC बँकेविरुद्ध नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल (NCLT) मध्ये खटला दाखल केला आहे. कंपनीने बँकेच्या या बेकायदेशीर कारभाराविरोधात कायदेशीर लढाई सुरू केली असून, या प्रकरणाचा पाठपुरावा करत असल्याचे वृत्त समोर आले आहे.

**घोटाळ्याचा व्याप वाढणार?**

PMC बँकेच्या या 'पेपर लोन' घोटाळ्याने सहकारी बँक क्षेत्रातील आर्थिक अनियमिततांचा मोठा पर्दाफाश केला आहे. RBI च्या ऑडिटमुळे हा घोटाळा उघड झाला असला, तरी यामागील मुख्य सूत्रधार आणि बँकेच्या कारभारातील गैरप्रकारांचा पूर्ण तपास बाकी आहे. या प्रकरणाने बँकेच्या ठेवीदारांचा विश्वास पुन्हा एकदा डळमळीत झाला आहे.या घोटाळ्याचा तपास आणि कायदेशीर प्रक्रिया पुढे काय वळण घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




## जिल्हा पं,प्रा शाळा शेलू येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी

महाराष्ट्र जीत

**सिंदखेड राजाः उमेश एखंडे**

सिंदखेड राजा तालुक्यातील जिल्हा प्राथमिक शाळा शेलु येथे लोकशाहीर,साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.या कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी मा.ग्रा सदस्य श्री एकनाथ खंदारे तर विशेष उपस्थिती म्हणून तंटामुक्ती अध्यक्ष आत्माराम भाऊ एखंडे होते.सर्व प्रथम लोकशाहीर,साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे व बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. लोकशाहीर ,साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर मार्गदर्शन करताना श्री जायभाये सर यांनी सांगितले की, लोकशाहीर,साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाटेगांव येथे १ ऑगस्ट १९२० रोजी झाला.त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना त्रास सहन करावा लागला.त्यांचे नाव १० व्या वर्षी शाळेत टाकले. परंतु परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते फक्त दिड दिवस शाळेत गेले. अण्णाभाऊ साठे यांनी फकीरा नावांची कादंबरी लिहून त्यामध्ये मातंग समाजाच्या व्यथा मांडल्या.त्यांनी कष्टकरी, कामगार,दीन दुबळे यांच्यासाठी कामं केली.पुढे त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना गुरू मानून सांगितले की, पृथ्वी ही शेष नागाच्या फणीवर नसून ती कष्टकरी, कामगार दीन दुबळे यांच्या तळहातावर आहे.म्हणून अशा साहीत्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन. इत्यादीसह अनेकांची उपस्थिती होती.प्रस्ताविक फ्री झाल्यावर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री कदम सर यांनी केले यावेळी गावातील अनेक नागरिक उपस्थित होते



## कारंजा भाजपा युवा मोर्चा कडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना आदरांजली.

महाराष्ट्र जीत

**कारंजा ( प्रतिनिधी )**

कारंजा भाजपा युवा मोर्चा कडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या जयंतीनिमित्य व लोकमान्य टिळक यांना त्यांच्या पुण्यतिथी निमित्य आदरांजली अर्पण करण्यात आली..आज दुपारी 1: 00 वाजता पार पडलेल्या कार्यक्रमात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105 व्या जयंती निमित्त स्थानिक स्टेट बॅंक जवळ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष रोहीत सम्रत व जैन प्रकोष्ठ चे जिल्हा संयोजक विनित गोलेच्छा यांच्या हस्ते हारार्पण व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कारंजा महीला मोर्चा अध्यक्षा व माजी नगराध्यक्षा सौ निशा गोलेच्छा यांनी अण्णाभाऊ साठेंच्या जिवन चरित्रावर प्रकाश टाकत आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर टीळक चौक येथे लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथि निमित्त त्यांच्या प्रतिमेस सौ .एकता गायकवाड यांच्या हस्ते हारार्पण करण्यात आले व पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी जैन प्रकोष्ठ चे शहर संयोजक अमोल रुईवाले भाजपा आय टी सेलचे जिल्हा संयोजक जिग्नेश लोडाया , अमय डोणगावकर ध्रुव केसवाणी पप्पु चव्हान दिनेश डोईफोडे प्रतिक्षा देसाई साहील राठोड मनीष सम्रत सत्यम राऊत अथर्व चिपडे सुलभ साखरकर अतुल ढेरे सह परिसरातील व्यापारी बंधु पत्रकार गोपाल कडु संदीप कुन्हे व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते





## "झाडांच्या सावलीत उज्वल भविष्य - विद्यार्थी आणि शिक्षकांचा हरित उपक्रम"....

### माऊली इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, कोंढाळा झामरे, वाशिम येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न...

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत ....मंगरूळपीर....**

**मंगरूळपीर :** माऊली इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी , कोंढाळा झामरे येथे वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण म्हणजेच झाडे लावणे, हे निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. वृक्ष आपल्याला प्राणवायू (ऑक्सिजन) पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, पर्यावरण शुद्ध करतात, पावसाचे प्रमाण वाढवतात आणि जमिनीचे धूप होण्यापासून संरक्षण करतात. याशिवाय पक्षी, प्राणी आणि मानव यांच्यासाठी वृक्ष हे निवारा आणि अन्नाचे स्त्रोतही आहेत. त्यामुळे वृक्षारोपण हा भविष्यासाठी एक सकारात्मक व आवश्यक पाऊल आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यांनी आवळा, बकुळ, गुलमोहर, करंज, सप्तपर्णी अशा अनेक प्रकारच्या औषधी व सजावटी वृक्षांची लागवड केली. संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारीही या उपक्रमात सहभागी झाले होते. प्राचार्य माननीय सुनील भोयर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले आणि पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे, असे आवाहन केले. प्राचार्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "वृक्ष हे पर्यावरणाचे रक्षण करणारे मुख्य घटक असून त्यांचे संवर्धन हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनीही पुढाकार घेऊन अशा उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा" कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी झाडांची काळजी घेण्याची शपथ घेतली. संस्थेच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



## लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन.

**भिवंडी(सुनील झळके)**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे १८/०२/२०२५ चे परिपत्रक व भिवंडी महानगरपालिका प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या निर्देशानुसार दि.०१/०८/२०२५ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने सहा आयुक्त (प्रशासन) अजित महाडिक यांच्या शुभहस्ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच नारपोली येथील आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास सहा आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४ गिरीष घोष्टेकर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यांमधील वाटेगांव येथे अत्यंत छोट्या गांवी लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट रोजी झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती चळवळींमध्ये त्यांनी त्यांच्या शाहिरीतून महत्वाचे योगदान दिलेले होते, अशा लोकशाहीर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मुख्यलयातील कार्यालयात मुख्य अग्निशमन अधिकारी राजेश पवार, परवाना, जाहिरात व मार्केट विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी, दुरध्वनी विभाग प्रमुख आश्विनी पांडव, बारनिशी विभाग प्रमुख दिपीका ठाकरे तर प्रभाग समिती क्र. ४ येथी कार्यक्रमास श्री गिरीष घोष्टेकर-प्रभाग अधिकारी, फ़ैसल तातली आरोग्य विभाग प्रमुख, हरीष भंडारी -मुख्य आरोग्य निरीक्षक, अनिल आव्हाड कार्यालयीन अधिक्षक प्र. स.क्र.४, तसेच श्री. विकास निकम माजी नगरसेवक, श्री लक्ष्मण गायकवाड (सेवानिवृत्त) शहर अभियंता भिनिशमनपा व इतर कर्मचारी या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## सात वर्षांचे सातत्य,गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप....

### आदिवासी हक्क संघर्ष समिती , मोखाडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने अभिनव उपक्रम....

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : दयानंद शिंदे**

**मोखाडा :** आदिवासी हक्क संघर्ष समिती आणि मोखाडा तालुका पत्रकार संघ यांच्याकडून खोडाळा येथील मोहिते कॉलेज या ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम करण्यात आला यावेळी कॉलेजचे प्राचार्य ज्येष्ठ विचारवंत डॉक्टर अनिल पाटील सर यांनी या उपक्रमाच्या सातत्याबद्दल प्रशंस करतानाच ज्या गोष्टी आम्ही विद्यार्थ्यांना शिक्षक म्हणून सांगू शकत नाही त्या गोष्टी या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना कळतात समजतात हेच या उपक्रमाचे फलित असल्याचेही त्यांनी सांगितले यावेळी त्यांनी आम्हाला शिक्षणावर प्रेम करणारे पुढारी नक्कीच आवडतात असे प्रतिपादन यावेळी केले . या कार्यक्रमांमधून




मोखाडा तालुक्यातील माध्यमिक आश्रम शाळा सर्व हायस्कूल रयत शिक्षण संस्थांच्या आश्रम शाळा खाजगी शाळा अशा दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन देणाऱ्या प्रत्येक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी आदिवासी विकास हक्क संघर्ष समिती मोखाडा गेल्या सात वर्षापासून सातत्याने एक अभिनव उपक्रम करीत आहे यामध्ये दहावी मध्ये प्रथम आलेले पहिले तीन आणि बारावी मध्ये प्रथम आलेले पहिले तीन अशा विद्यार्थ्यांची नावे घेणे त्यांच्यासाठी सन्मानचिन्ह बनवणे त्यांना शालेय वस्तूंचं बक्षीस म्हणून वाटप करणे याशिवाय पालकांसोबत त्यांचा सन्मान करणे आणि याच वेळी विविध वक्त्यांमार्फत, शिक्षकांमार्फत सर्वच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे या विद्यार्थी दशेतील महत्त्वाच्या विषयांना हात घालून त्यांच्यामध्ये बदल घडवून आणणे असा उपक्रम ही समिती करीत असल्याने समिती अध्यक्ष माजी सभापती प्रदीप वाघ यांचे तालुक्यातून अभिनंदन होत आहे. खोडाळा येथील मोहिते कॉलेज या ठिकाणी नुकताच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला यामध्ये माजी सभापती वाघ यांनी या भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की आज जेव्हा आम्ही हा उपक्रम करतो तेव्हा बघतो बहुतांशी ठिकाणी गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मुलींचा सहभाग अधिक आहे मात्र दहावीनंतर बारावी वर्गाची पटांची संख्या बघितली तर मुलांची संख्या अधिक आणि मुलींची कमी दिसते यातून मुलींचे लग्न करणे असेल किंवा पुढील शिक्षण घेण्याविषयी पालक वर्ग अनु उत्सुक दिसून येतो. ही गंभीर गोष्ट आहे यात बदल घडण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती आवश्यक आहेच मात्र मुलींनी सुद्धा आपल्या शिक्षणाचे महत्व आणि तुम्ही शिक्षणाविषयी किती गंभीर आहोत हे पालकांना दाखवून दिले पाहिजे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते प्रल्हाद कदम यांनी वाघ यांच्या उपक्रमाबद्दल अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य काशीद सर, दीपक कडलक, पत्रकार ज्ञानेश्वर पालवे, माजी सरपंच संजय वाघ , प्रबंधभुमी महाराष्ट्र न्यूज पालघर जिल्हा संपादक चंद्रकांत गांगुर्डे, पत्रकार हनीफ शेख, पत्रकार तुकाराम रोकडे ,वाकड ग्रामपंचायतचे उपसरपंच नंदू वाघ शिक्षक नेते पवार आणि विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टी वाशिम ग्रामीण मंडळाच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन.

### आ.श्याम खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये जयंती साजरी

वाशिम(प्रतिनिधी) स्थानिक वाशिम येथील वाशिम मंगरूळपीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये वाशिम भारतीय जनता पार्टी ग्रामीण तर्फे लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची 105 वी जयंती साजरी करून अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन यावेळी या कार्यक्रमाला वाशिम तालुका अध्यक्ष एकनाथ पाटील कड, सुभाषराव नानोटे,गजानन गोटे, प्रल्हाद गोरे,सोपान काकडे, बाबाराव महाले ,अंभोरे मामा, डॉ योगेश नानवटे ,राजेश घुले यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पर अर्पण करून अभिवादन केले. यानंतर उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या सामाजिक साहित्यिक क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती देऊन अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा तसेच साहित्य क्षेत्रामध्ये केलेल्या दमदार कार्याचा आढावा स्पष्ट केला.अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने आपण पुढे घेऊन जाण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.



## संपादकीय

# लग्नासाठी टिकटॉकर मातेचा घेतला जीव!

पाकिस्तानात सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर्सची मोठ्या प्रमाणात हत्या होते आहे. तरुणींना टार्गेट करण्यात येत असून, त्यांना नाहक आपले प्राण गमवावे लागत आहेत; पण हे प्रमाण आता इतकं वाढलंय की तरुण मुली तर जाऊ द्या, त्यांच्या आयांनाही मारलं जात आहे. पाकिस्तानात सध्या नुकतीच घडलेली एक घटना जगभरात व्हायरल होते आहे.

पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील सुमीरा राजपूत ही एक सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर. टिकटॉक क्रिएटर म्हणून पाकिस्तानात ती बरीच प्रसिद्ध आहे. तिची १५ वर्षीय मुलगीही सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर आहे. या दोघींचे मिळून एक लाखापेक्षाही जास्त फॉलोअर्स आहेत; पण याच सुमीरा राजपूत यांची नुकतीच हत्या झाली. का? तर १५ वर्षांच्या मुलीची आई असलेल्या सुमीरावरही लग्नासाठी जबरदस्ती केली जात होती.

सुमीरा यांच्या मुलीनंच स्वत: सांगितलं, काही जण जबरदस्तीनं माझ्या आईशी लग्न करण्यासाठी बऱ्याच काळापासून तिला त्रास देत होते, तिचा छळ करीत होते. तिनं लग्नाला नकार दिला म्हणून तिची हत्या करण्यात आली. सुमीरा राजपूतचे टिकटॉकवर ६० हजार फॉलोअर्स आहेत, तर १० लाखांपेक्षा जास्त लाइक्स अनेकदा तिच्या कंटेन्ट्सला मिळाले आहेत. त्यांची मुलगीही टिकटॉकवर अक्टिव्ह असून, टिकटॉकवर तिचेही ५८ हजार फॉलोअर्स आहेत. पाकिस्तानात महिलांची, तरुणींची हत्या हा प्रकार नवीन नाही. त्यातलं प्रमुख कारण अर्थातच 'ऑनर किलिंग' आहे. घराची, कुटुंबाची, समाजाची इज्जत धुळीला मिळवली, 'संस्कृती बुडवली' म्हणून त्यांना ठार मारलं जातं. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे तरुणी तर सोडाच; पण ज्या महिला स्वत: माता आहेत, ज्यांना मुलं आहेत, अशा मध्यमवयीन महिलांनाही याच आरोपाला सामोरं जाऊन त्यांच्याच घरच्यांकडून त्यांचा जीव घेतला जातो. जीव घेणारी व्यक्ती बऱ्याचदा कधी त्यांचा सख्खा भाऊ असतो, कधी बाप असतो, कधी नवरा असतो, तर कधी दीर.. गेल्या वर्षभरात पाकिस्तानात 'ऑनर किलिंग'च्या नावाखाली ५४७ महिलांना आपला जीव गमवावा लागला! त्यांच्या कटुंबीयांनीच त्यांचा जीव घेतला! इस्लामाबादच्या 'सस्टेनेबल सोशल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन' या संस्थेच्या माहितीनुसार गेल्यावर्षी पाकिस्तानात ३२ हजारांपेक्षाही जास्त लैंगिक हिंसाचाराच्या तक्रारी पोलिसांकडे दाखल झाल्या. त्यात ५४७ घटना ऑनर किलिंगच्या होत्या. लैंगिक हिंसाचाराच्या घटना तर मोजता येणार नाहीत इतक्या आहेत. कारण आपल्यावर लैंगिक अत्याचार झाल्यास महिला स्वत:च त्याची तक्रार करण्यासाठी पुढे येत नाहीत. कारण बऱ्याचदा या घटनांमध्ये मुख्य आरोपी त्यांचा जवळचा नातेवाईकच असतो! नुसत्या बलुचिस्तान प्रांतातच गेल्यावर्षी ऑनर किलिंगच्या ३२ अधिकृत घटना घडल्या. त्यातल्या केवळ एकालाच आतापर्यंत शिक्षा झालेली आहे. गेल्याच महिन्यात १७ वर्षीय सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर सना युसूफला तिच्याच घरात गोळ्या घालण्यात आल्या होत्या.. सोशल मीडिया स्टार कंदील बलोचलाही याच पद्धतीनं तिच्याच घरात गोळ्या घालून ठार करण्यात आलं होतं. पाकिस्तानची ती पहिली सोशल मीडिया सेलिब्रिटी मानली जाते.

# अकोला जिल्हा महिला रुग्णालयात ई-निविदा गैरव्यवहार तिघा वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तत्काळ निलंबन

महाराष्ट्र जीत

**अकोला -:** अकोला जिल्हा महिला रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सुरू करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व अनियमितता उघडकीस आली असून, यामुळे आरोग्य विभागात खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणात तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे.

**काय आहे प्रकरण?**

जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात शिशु गहन चिकित्सा विभाग साठी आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३१ पदांसाठी ई-निविदा मागवण्यात आल्या होत्या. मात्र, या प्रक्रियेमध्ये अत्यंत अपारदर्शक पद्धतीने नियमांचे उल्लंघन झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे

**भाजपा आमदार श्याम खोडेच्या हस्तक्षेपानंतर कारवाईला वेग**




या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता, वाशिमचे भाजपा आमदार श्याम खोडे यांनी हे प्रकरण विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात उचलून धरले. त्यानंतर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी तत्काळ चौकशीचे आदेश दिले.

**निलंबित अधिकारी कोण?**

चौकशी अहवालानुसार, खालील तिघांवर गंभीर आरोप सिद्ध झाले आहेत डॉ. तरंगतुषार वारे – जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. जयंत पाटील – जिल्हा महिला रुग्णालयाचे अधीक्षक, ए. एन. डांबरे – प्रशासकीय अधिकारी तिघांनाही तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

**चौकशी अहवालातील धक्कादायक निष्कर्ष**

एकूण ७२ निविदांपैकी फक्त ४ निविदांना अंतिम रूप देण्यात आले. त्यापैकीही फक्त २ निविदाच अधिकृत घोषित झाल्या. संबंधित निविदा निलंबित अधिकाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे निविदा प्रक्रियेचा गैरवापर, नियमांचे उल्लंघन आणि सार्वजनिक निधीचा दुरुपयोग झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**निलंबनानंतर आरोग्य विभागात खळबळ**

या तिन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निलंबनामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेत मोठी खळबळ उडाली आहे. स्थानिक डॉक्टर संघटनांपासून ते प्रशासकीय पातळीवर याची जोरदार चर्चा सुरू आहे. आता या तिघांवर विभागीय चौकशी सुरु होणार असून, त्यांचा कारकिर्दीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**नागरिकांच्या विश्वासाला तडा?**

या घोटाळ्यामुळे अकोला जिल्ह्यातील आरोग्य सेवा यंत्रणेवर नागरिकांचा विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे. यापुढे आरोग्य खात्याने अधिक पारदर्शक व नियमबद्ध कार्यपद्धती राबवावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. अकोला जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेसमोरील हा धक्का, प्रशासनासाठी जागृतीचे सावट आहे. आता याला उत्तरदायित्वाची जोड देणे अत्यंत आवश्यक आहे.

# डॉ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105 वी जयंती साजरी

नाशिक,प्रतिनिधी गोकुळ लोखंडे

नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नाशिक पुर्व विभाग येथे सरकारी इतमामात आज साहित्यरत्न डॉ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 105 वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी विभागीय अधिकारी तथा सहा.आयुक्त सन्मा. राजाराम बा.जाधव साहेब यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमा पुजन केले. व उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी बंधू भगीनी यांस या जयंती निमीत्त शुभेच्छा दिल्या. तसेच या प्रसंगी श्री गुणवंत वाघ साहेब यांनी लोकशाहिर अण्णाभाऊ यांनी लिहीलेली लोकप्रिय छक्कड गाऊन उपस्थित जनांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी कार्यालयीन प्रभारी अधिक्षक सागर शिवाजी खैरे साहेब, विभागीय स्वच्छता निरीक्षक सुनिल भिमराव शिरसाट साहेब, प्रभारी सहा. अधिक्षक भरत गोंधळे कैलास भागवत



साहेब, मिलिंद पगारे साहेब, प्रविण कापसे साहेब, संदिप गोधडे साहेब, हुसैन पठाण साहेब, विशाल पवार साहेब, सुनिल खैरे साहेब, नरेश कल्याणी साहेब, कुणाल जाधव साहेब, अनिकेत खेलुकर साहेब, सारंग जाधव साहेब, प्रेमा कदम मॅडम, . वंदना तळवे मॅडम, इंदुमती सातपुते मॅडम, विशाल घागरे, गणेश कासार, विक्रम रेवर, संकेत खैरणार, महेश भालेकर, मुकुंद कटारे, गणेश जगताप, विष्णु कुंठे आदी मान्यवर उपस्थित होते.

# धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालक सभासद नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**

**ठाणे (जिमाका) :-** महाराष्ट्र शासन विभागामार्फत राज्यातील ऑटोरिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालकांच्या कल्याणासाठी धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ, मुंबई या मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळाचे सभासद होण्याकरीता शासनाने ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळ यांनी वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे असेल. सध्या यासाठीचे नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम रुपये 500/- राहील. तसेच वार्षिक सभासद शुल्क रक्कम रुपये 300/- राहिल. शुल्क भरणा करणे बंधनकारक आहे. सदर नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करावयाचे आहे. धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या अधिकृत वेबसाईटची https://ananddighekalyankarimandal.org ही लिंक दिलेली आहे. या लिंकव्दारे ऑटोरिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालक सभासद नोंदणीसाठी ऑनलाईन अर्ज करु शकतात. वरील लिंकव्दारे रिक्षा चालक आणि टॅक्सीचालक सभासद नोंदणीसाठी सोबत जोडलेल्या चार्टप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करु शकतात, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण, आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

# चि. आर्यन राठोड इस्त्रो भेट परीक्षेत अकोला जिल्ह्यात प्रथम

महाराष्ट्र जीत

**//प्रतिनिधी भारत चव्हाण//**

सारकिन्ही,बार्शीटाकळी तालुक्यातील वसराम नाईक आडे उच्च माध्यमिक आश्रम शाळा साखरविरा येथील विद्यार्थ्यांची इस्त्रो भेटीसाठी निवड झाली आहे

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या वतीने या संस्थेस भेट देण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण अमरावती विभागामार्फत विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी 27 जुलैला अकोला जिल्ह्यातील चाचणी परीक्षा परंडा ता बार्शीटाकळी येथे घेण्यात आली.




झालेल्या चाचणी परीक्षेत जनता ज्ञानोपासक मंडळ लोहगड द्वारा संचालित वसराम नाईक उच्च माध्यमिक आश्रम शाळा साखरविरा येथील आर्यन दीपक राठोड हा वर्ग १२ वी विज्ञान शाखेत शिकत असून चारही आश्रम शाळेतून जिल्ह्यातून प्रथम क्रमांकावर आला,त्याला 100 पैकी 86 गुण मिळाले त्याचप्रमाणे या उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. आर्या सुनील नायसे ही वर्ग ११वी विज्ञान शाखेत शिकत असून मुलीन मधून तिसरा क्रमांक पटकविला .परीक्षेतील गुणवत्ता यादीत दोघांचेही इस्त्रो भेटीसाठीची निवड निश्चित झाली आहे. माजी मंत्री मखराम पवार यांच्या आशीर्वादाने इस्त्रो भेटीचे स्वप्न विद्यार्थ्यांचे पूर्ण झाले तसेच संस्थेचे अध्यक्ष अविनाश पवार सचिव सतीश पवार प्राचार्य अनिल धोत्रे, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# सोयाबीन बियाणे मध्ये फसवणूक झाल्या प्रकरणी शेतकऱ्यांनी बार्शीटाकळी तालुका कृषी अधिकारी यांना दिले निवेदन.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी भारत चव्हाण**

सारकिन्ही,,बार्शीटाकळी तालुक्यातील झोडगा येथील शेतकरी कस्तुरा उत्तम जाधव यांनी महान येतील संबंधित कृषी सेवा केंद्र कडून दप्तरी 354 सोयाबीन बियाणे मध्ये फसवणूक झाल्या प्रकरणी शेतकऱ्यांनी बार्शीटाकळी तालुका कृषी अधिकारी यांना 30 ,7 ,2025 रोजी तक्रार दिली आहे तरीसुद्धा चार दिवसापासून शेतकरी कस्तुरा उत्तम जाधव यांच्या शेतामध्ये पाहणी करण्यासाठी कृषी सहाय्यक तालुका कृषी अधिकारी कोणतेच वरिष्ठ कर्मचारी आतापर्यंत शेतामध्ये पाहणी करण्यासाठी आले नसल्याने शेतकरी खूप चिंताग्रस्त झाली आहे त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे राहणार झोडगा येथील शेतकरी कस्तुरा उत्तम जाधव यांनी दिनांक 13, 6, 2025 रोजी महान येथील संबंधित कृषी सेवा केंद्राकडून दप्तरी 354 लेबल लावलेले D335002,,,D334993,,,D334996,, हे तिन बैग सोयाबीन बियाणे खरेदी केलेले सोयाबीन बियाण्या मध्ये फसवणूक झाली म्हणून झोडगा येथील शेतकरी ने बार्शीटाकळी तालुका कृषी अधिकारी यांना तक्रार अर्ज दिले आहे हा शेतकरी झोडगा येथील रहिवासी असून यांची शेती मौजा वस्तापूर तालुका बार्शी टाकळी जिल्हा अकोला येथे राहतात सदर शेतीचा सर्वे नंबर 20 /1 असुन अल्पभूधारक शेतकरी आहे मी सावकारी कर्ज काढून सोयाबीन बियाण्याचे बॅग खरेदी केले आहे अगोदरच मी कर्जबाजारी आहे मुख्यमंत्री साहेबांनी सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते परंतु आतापर्यंत सातबारा कोरा झाला नाही आणि माझी हलाखीची परिस्थिती असल्यामुळे मी अजून कर्जबाजारी झालो आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माझ्या शेतात येऊन चौकशी करून मला माझ्या शेतीची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे कारण दरवर्षी मी 354 दप्तरी या सोयाबीन पिकाची पेरणी



करतो म्हणून मला या सोयाबीन पिकाची अनुभव असल्यामुळे या सोयाबीन पिकांची उत्पादन चांगले मिळतात परंतु दप्तरी 354 सोयाबीन बियाणे मध्ये फसवणूक झाली आहे बार्शीटाकळी तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे महान येथील संबंधित कृषी सेवा केंद्र यांनी 354, दप्तरी सोयाबीन चे लेबल लावलेले असून त्या बॅगमध्ये दुसऱ्या जातीचे दुसरेच सोयाबीन निघाले असुन सोयाबीन पिकाची वाढ शुद्धा झाली नसल्याने उत्पादना घट निर्माण होईल यामुळे मला सोयाबीन पिकांचे उत्पादन कमी होणार आहे आणि मी अजून शिल्लक कर्जबाजारी होणार आहे गतवर्षी पेक्षा यावर्षी सोयाबीन पिकाचे चांगले उत्पादन होईल आणि माझी आर्थिक परिस्थिती जोमाची व्हावी म्हणून मी दर्जेदार आणि नामांकित असलेल्या कंपनीचे दप्तरी 354 या कंपनीचे उच्च गुणवत्ता पूर्वक बियाणे दिनांक 13 ,6 ,2025 रोजी महान येथील संबंधित कृषी सेवा केंद्रा मधून खरेदी केले उच्च गुणवंतापूर्वक बियाण्याचे लेबल असलेल्या बॅग मला संबंधित कृषी सेवा केंद्र यांनी दिल्या लेबल लावलेले असल्यामुळे मी खरेदी केलेलेच बियाणे मला दिले असे समजून सदर बियाणे घरी घेऊन आलो सदर सोयाबीन बियाणे वाहनाची पेरणी मी माझ्या शेतीमध्ये केली बियाणे उगवल्यानंतर पिकांची पाहणी केली असता माझ्या लक्षात आले की मला दप्तरी 354योजी दुसरेच कंपनीचे बोगस बियाणे दिले याबाबत मी कृषी सेवा केंद्र संचालक यांना वारंवार विचारणा केली असता त्यांनी मला सांगितले की कंपनीचे अधिकारी वर्ग माझ्या शेतात पिकाची पाहणी करायला येतील परंतु आज दोन आठवड्याच्या कालावधी उलटून गेल्यानंतरही कोणीहीअधिकारी आले नाही सदर कृषी सेवा केंद्र संचालक सुद्धा योग्य ती माहिती देत नाही आहे ही शेतकरी वर्गाची सरळ सरळ फसवणूक आहे यातून माझे आर्थिक नुकसान झाले आहे तरी माझ्या शेतीची आपण स्वतः पाहणी करून दप्तरी 354 सोयाबीन बियाणे कंपनीवर कारवाई करण्यात यावी व मला माझ्या शेतीच्या प्लॉट नुसार झालेले नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदन मध्ये झोडगा येथील कस्तुरा उत्तम जाधव या शेतकऱ्यांनी म्हटले आहे

# समाजाची सेवा करण्यासाठी शासकीय नोकरी हे महत्वाचे क्षेत्र -अपर मुख्य सचिव डॉ.विकास खारगे

## जिल्हाधिकारी कार्यालय येथे महसूल दिन कार्यक्रम संपन्न

महाराष्ट्र जीत

**विशेष प्रतिनिधी (नागेश पवार)**

**ठाणे,दि.01(जिमाका):-** समाजाची सेवा करण्यासाठी शासकीय नोकरी हे एक महत्वाचे क्षेत्र असून आपण प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) डॉ.विकास खारगे यांनी आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित महसूल दिनाच्या कार्यक्रमात केले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, अपर आयुक्त वैशाली इंदानी, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, सह आयुक्त रवी पाटील, रविंद्र पवार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, अमित सानप, सर्व प्रांताधिकारी, तहसिलदार, व्याख्याते डॉ.दत्ता कोहिनकर, आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी अपर मुख्य सचिव (महसूल) डॉ.विकास खारगे पुढे म्हणाले की, महसूल विभाग हा शासनाचा चेहरा आहे. महसूल विभागाने कोणती कामे केली आहेत व कोणती कामे करणार आहे, हे जनतेपर्यंत पोहोचविले पाहिजे. महसूल विभागाने लोकांसाठी अधिक जबाबदारीने, पारदर्शक व विश्वासार्हपणे काम केले पाहिजे. महाराष्ट्राचे नाव देशातच नाही तर जगामध्ये घेतले जाते. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योजक गुंतवणूक करीत आहेत. देशाच्या जीडीपी मध्ये महाराष्ट्राचा 15 टक्के वाटा आहे. आपले राज्य सर्व क्षेत्रात आघाडीवर आहे. ते पुढे म्हणाले की, महसूल विभाग इतर सर्व विभागांच्या समन्वयाने काम करतो. महसूल विभाग शासनाचे प्रतिनिधी आहे. लोकांना न्याय मिळेल अशी विश्वासार्हता निर्माण करण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. यासाठी सर्व विभागांनी एकत्र येवून काम करणे गरजेचे आहे. महसूल सप्ताह हा केवळ सात दिवसांचा नसून संपूर्ण वर्षभर आपण लोकांना उत्तम दर्जाची सेवा दिली पाहिजे. लोकाभिमुख कामे करणारा विभाग म्हणून महसूल विभागाकडे पाहिले जाते. तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्व सेवा ऑनलाईन करण्यात याव्यात, जेणेकरुन जनतेला कुठूनही आपली कामे करता येतील. सर्व महसूल विभागात ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर झाला पाहिजे. महसूल विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी




मी प्रयत्न करणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. लोकांची कामे गतिमानतेने होतील, महसूल विभागावर जनतेचा विश्वास वाढेल, राज्याची प्रगती होईल, अशी सेवा आपण सर्वांनी मिळून करायाची आहे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात अपर मुख्य सचिव (महसूल) डॉ.खारगे यांना कोकण विभागातील सात जिल्ह्यांची माहिती दिली. महसूल दिनानिमित्त पुरस्कार मिळालेल्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. ज्यांना पुरस्कार मिळाल नाही त्यांनी आजून जोमाने काम करुन पुढच्या वर्षी पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, महसूल विभाग सर्व स्तरावर काम करतो. कोणतीही आपत्ती असो महसूल विभाग नागरिकांना सेवा पुरविण्यात अग्रेसर असतो. कोणतेही काम यशस्वी करायचे असेल तर ते काम महसूल विभागाकडे सोपविले जाते. कोकण विभागाला ऐतिहासिक वारसा आहे. कोकण विभागाने नागरिकांना उत्तमोत्तम सेवा पुरविण्यासाठी महत्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत. आपले सेवा पोर्टलवरील सर्व सेवा ग्रामपंचायत स्तरावर सक्रीय करण्यात येणार आहेत. मुंबई उपनगरात ऑनलाईन प्रॉपर्टी कार्ड सुविधा सुरु करण्यात येणार आहे. जमिनीचे फेरफार क्लिअर करण्यात येणार आहेत. शिवदुर्ग दर्शन प्रकल्पांतर्गत 51 किल्ले निवडले असून त्यातील 35 बाबींचा अभ्यास सुरु आहे. कोकणात पर्यटनाला चालना देण्यात येणार आहे. पर्यटकांना उत्तमोत्तम सुविधा देण्यावर भर असेल. यासाठी व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात येणार आहे. तसेच स्वच्छ सागरी किनारे ही मोहिम देखील प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ म्हणाले की, महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. नागरिकांना लोकाभिमुख सेवा उपलब्ध करुन देणे ही महसूल विभागाची जबाबदारी व दायित्व आहे. त्यानुसार नागरिकांना उत्तम दर्जाची सेवा पुरविण्यासाठी महत्वाचे उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. जिल्ह्यात तालुक्याच्या ठिकाणी मॉडेल सेतू केंद्र तयार करण्यात येणार आहे. आपले सरकार सेवा केंद्राद्वारे गाव पातळीवर सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. डेटा बँक तयार करणार आहे. महसूल सप्ताहानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. शासन व प्रशासनाची सर्वसामान्य नागरिकांमध्ये चांगली प्रतिमा होण्यासाठी महसूल सप्ताहानिमित्त विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येतील. महसूल दिनानिमित्त अपर मुख्य सचिव महसूल डॉ.विकास खरगे यांच्या हस्ते कोकण विभागातील सात जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्पना साठे यांनी केले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)
१ २ ३ ४ ५ ६

## नियुक्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. श्री. शशिकांत शिंदे यांची भेट – रतन चावला राज्य प्रमुख सिंधी सेल

महाराष्ट्र जीत

देवळाली कॅम्प प्रतिनिधीः गोकुळ लोखंडे

येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (श. पा. गट) राज्य प्रमुख सिंधी सेलचे रतन चावला यांनी नव नियुक्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. श्री. शशिकांत शिंदे यांची भेट घेऊन देवळाली कॅन्टोन्मेंट मधील विविध समस्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये देशातील सर्व छावनी परिषदांध्ये अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधीची निवडणुक झालेली नाही. परंतु बहुतांश छावणी परिषदांची निवडणुकांची तयारी चालु आहे फक्त देवळाली छावनी परिषदमध्ये निवडणुकीबाबत कोणत्याही प्रकारच्या हालचाली निवडणुक आयोगाकडुन करण्यात आल्याचे दिसुन येत नाही त्यामुळे देवळाली छावनी परिषदमधील नागरिकांना नागरी सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. तसेच देवळाली छावनी परिषदमधील ब-याच नागरिकांच्या घरापर्यंत सिवरेज लाईन जोडली गेलेली नसतांनाही छावनी परिषद सरसकट सर्व नागरिकांकडून सिवरेज टॅक्स अन्यायकारक पद्धतीने वसुल करीत आहे. तरी याबाबत सिवरेज लाईनचे सर्वेक्षण करुन त्याची सत्यता पडताळण्याची गरज आहे. व त्यातील तफावत छावनी परिषदच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणुन देण्याची गरज निर्माण झाली आहे. जेणेकरुन स्थानिक प्रशासनाच्या कारभाराबद्दल नागरिकांमध्ये विश्वसनियता निर्माण होईल. आगामी नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजन समितीच्या आढाव्यानुसार नाशिकमध्ये देशभरातुन साधारण २० कोटी भाविक येण्याची शक्यता लक्षात घेता नाशिकरोड व देवळाली कॅम्प रेल्वे स्टेशनची सध्याची स्थिती पाहता रेल्वे प्रशासनावर अतिरिक्त भार पडणार आहे. म्हणून रेल्वे प्रशासनाने भाविकांची अव्यवस्था टाळण्यासाठी योग्य नियोजन करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी नाशिकरोड व देवळाली कॅम्प या रेल्वेच्या चार लाईन टाकुन योग्य वेळेवर भाविकांच्या आवागमनावर नियंत्रण करण्यासंदर्भात उपाययोजना करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच महाराष्ट्र शासनाने २०२५-२६ पासून ११ वी प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने अवलंबल्याने अडीच महिण्यापुर्वीच इयत्ता १० वी चा निकाल लागुनही सद्यस्थितीची प्रवेश प्रक्रिया ही वेळखाऊ बनु पाहत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर याचा विपरित परिणात होत आहे. तरी शासनाचे यासंदर्भात विचार करुन ही प्रक्रिया तात्काळ पुर्णत्वास नेण्यात यावी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर सर्व समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत पुढील आवश्यक कारवाई करण्याची विनंती करण्यात आली.



## घरकुलच्या कोणत्याही बिलासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही...

### ग.वि. अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**तालुका प्रतिनिधी**

माहूर तालुक्यात आठ हजार घरकुल मंजूर झालेले आहेत घरकुलाचे दुसरे,तिसरे, चौथे बिल काढण्यासाठी कोणत्याही कर्मचारी किंवा अधिकारी यांना पैसे देण्याची गरज नाही. नागरिकांनी जागृत राहिले पाहिजे. घरकुलाचे बिल संदर्भात काही अडचण असल्यास मला प्रत्यक्ष भेटा लाच देणे व घेणे कायद्याने गुन्हा आहे असे प्रतिपादन माहूर चे गट विकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी केले तांत्रिक अधिकारी विजय श्रीरामे यांनी वानोळा येथील अनेक लाभार्थ्याकडून दुसरे व तिसरे बिल काढण्यासाठी 2000, पाच हजार ची रक्कम घेऊन घरकुल लाभार्थ्यांची पिळवणूक करीत असल्याबाबत लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा संविधान अभ्यासक पत्रकार पंडित धुप्पे व सारंग राठोड यांनी केली होती या तक्रारीची गंभीर दखल घेत चौकशी करण्याचे आदेश विस्तारअधिकारी प्रदीप मुरादे यांना देण्यात आला आहे. पंचायत समितीचे घरकुल विभागाचे कंत्राटी तांत्रिक कनिष्ठ अभियंता विजय श्रीरामे यांच्याकडे वानोळा सह तालुक्यातील 15 ते 20 गावातील दोन ते तीन हजार घरकुलाचे बांधकाम बघणे, टप्प्याटप्प्याने झालेल्या कामाची बिल सादर करणे इत्यादी कामे आहेत. वानोळा सह प्रत्येक गावातील आणि प्रत्येक लाभार्थ्याकडून दुसरे व तिसरे बिलासाठी दोन ते अडीच हजार रुपये घरकुल लाभार्थ्याकडून घेत असल्याचे समजले काही लाभार्थ्याकडून फोन पे द्वारे त्यांनी रक्कम स्वीकारण्याची पुरावे असल्यामुळे वानोळा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा संविधान अभ्यासक पत्रकार पंडित धुप्पे व सारंग राठोड यांनी गटविकास अधिकारी व वरिष्टाकडे देखील तक्रार केली या तक्रारीनुसार विजय श्रीरामे यांची चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून निलंबित करावे अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांनी विस्तार अधिकारी प्रदीप मुरादे यांच्याकडे तपास दिला असून घरकुलाचे कोणतेही बिलासाठी कोणालाही पैसे देऊ नये काही अडचण असल्यास मला प्रत्यक्ष नागरिकांनी भेटावे असे आवाहन यावेळी केलेआहे. यावेळी पत्रकार पंडित धुप्पे, सोनू तोडसाम, सांरग राठोड,गणेश राठोड, अजय पवार ग्रामसेवक, तांत्रिक अधिकारी विजय श्रीरामे यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# शालेय योजनेंपासून विद्यार्थी वंचित राहू नये

## दिलीप बनसोडे,शिक्षणाधिकारी योजना यांचे आवाहन

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**माहूर तालुका प्रतिनिधी**

शिक्षण संचालनालय योजना महाराष्ट्र राज्य पुणे,शिक्षणाधिकारी योजना जि.प.नांदेड मार्फत राबविण्यात येणाऱ्या विवीध विद्यार्थी लाभाच्या योजना संदर्भात 'योजनेचा जागर' कार्यशाळा दि.30/07/25 रोजी वसंतराव नाईक सभागृह पंचायत समीती माहूर येथे मा.शिक्षणाधिकारी योजना जि.प.नांदेड दिलीप कुमार बनसोडे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती.दिलीपकुमार बनसोडे यांच्या मार्गदर्शनात इयत्ता 6वी ते 12 वी मधील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या विविध योजनाना प्रभावीपणे राबवण्यासाठी सर्व माध्यमातील




जि.प.व खाजगी माध्यमिक मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख व विषय तज्ञ यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी लाभाच्या योजना सर्व स्तरांतून परिणामकारकपणे राबविण्यात याव्यात व त्यापासून कुणी वंचित राहणार नाही याबाबत सर्वांनी जागरुक राहून कार्य करावे असे आवाहन कार्यशाळेचे अध्यक्ष दिलीपकुमार बनसोडे यांनी केले. तसेच दुर्गम-डोंगरी-अदिवासी भागातील विद्यार्थी वर्गासाठी स्वतःला झोकून द्यावं लागेल तसेच या समाजाचं आपण सर्वांना देणं लागतं ते आपल्या कार्यातून आपण पूर्णत्वास न्यावं असेही ते म्हणाले.

या कार्यशाळेस यावेळी संतोष शेटकार गटशिक्षणाधिकारी, माधवराव शिंगडे उपशिक्षणाधिकारी योजना,संग्राम कांबळे शिक्षण विस्तार अधिकारी करंजी बीट,वानोळा बिटचे शिक्षण विस्तार अधिकारी बिरमवार , गटसमन्वयक संजय कांबळे,रुस्तम शेख, काशीनाथ थोंटे, शेषराव पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.यांच्यासह सर्व माध्यमातील मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि साधनव्यक्ती गटसाधनकेंद्र माहूर हे उपस्थित होते.यावेळी माधवराव शिंगडे उपशिक्षणाधिकारी यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या विविध शिष्यवृत्या तसेच रुस्तुम शेख यांनी विविध लाभाच्या शासनाच्या योजनांच्या संदर्भात माहीती देताना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी माहुरचे गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांनी आभार मानले व सर्वांना काम करण्यासाठी प्रोत्साहित केले.

## उरड – मोरझाडी रस्त्याची दुरवस्था; चार किलोमीटर रस्ता उखडलेला, ग्रामस्थ त्रस्त :- रंजित तायडे

**अकोला प्रतिनिधी नरेंद्र इंगळे**

बाळापूर तालुक्यातील उरड ते मोरझरी दरम्यानचा सुमारे चार किलोमीटर लांबीचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की, पावसाळ्यात येथे चिखल, खड्डे आणि पाणी साचलेली ठिकाणं दिसून येतात. त्यामुळे शाळकरी मुलं, महिला, आजारी व्यक्ती आणि वाहनचालकांचे मोठे हाल होत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची डागडुजीही झालेली नाही. स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या भागाकडे दुर्लक्ष केले आहे. यासंदर्भात मोरझरी गावातील रंजीत भारत तायडे यांनी दिनांक 27 जुलै 2025 रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला यांना तक्रार ई-मेलने सादर केली आहे. तायडे यांनी आपल्या




तक्रारीत स्पष्ट केले आहे की, "रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि चिखलामुळे अपघाताचा धोका वाढत आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाताना अडचणी येतात. पावसाळ्यात रस्ता ओळखू येत नाही, पाणी साचते आणि चालणे अवघड होते." ग्रामस्थांनलवकरात लवकर रस्ता दुरुस्त करून द्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा करू असा इशारा रंजित तायडे यांनी दिला .

## जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

महाराष्ट्र जीत

**अमोल टोपले**

**मोखाडा:-** जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र आणि शिवसेना उपनेते निलेश सांबरे यांच्या संकल्पनेतून कोकणातील शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले झडपोली येथे अत्याधुनिक रुग्णालय उभारून ते निःशुल्क सेवा देत असल्याचे त्यांनी सांगितले विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या मोखाडा तालुक्यातील आसे विभाग येथे वाटण्यात आल्या भविष्यात संस्थेचे स्पर्धा परीक्षा केंद्र तालुक्यात सुरू करुन अधिकारी निर्माण करण्याचा आपला प्रयत्न राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले. संस्थेचे पालघर विभाग प्रमुख रवींद्र खुताडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिजाऊ संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी वह्या वाटप आणि करिअर मार्गदर्शन केले जाते. आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, शेती या क्षेत्रांमध्ये संस्थेचे कार्य सुरू आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याचे आणि शालेय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले याप्रसंगी रवींद्र खुताडे साहेब- जिजाऊ संस्था - पालघर जिल्हा प्रमुख, महेश महाले,काशिनाथ जाधव,चंदर कोती,सदाशिव वाघ,धाकलु वाजे,चंदर कोरडे,मधुकर कनोजा आदी कार्यकर्ते तसेच विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर मुलाणी यांची निवड

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप**

**सासवड दिनांक 30 :** अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर चांदभाई मुलाणी यांची निवड करण्यात आल्याची घोषणा अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी केली.



सासवड येथे ट्रस्टच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ही निवड करण्यात आली. नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष विजय वढणे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले व त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आप्पासाहेब भांडवलकर, उपाध्यक्ष राजेंद्र धोत्रे, सचिव अतुल दादा पवार, सल्लागार मंगेश गायकवाड, खजिनदार इजाज पानसरे, दत्ता सूर्यवंशी, पुरंदर तालुका युवक अध्यक्ष येशू जाधव, सासवड शहर उपाध्यक्ष समिर बागवान, विलास खोमणे, चंद्रकांत भिसे, रूतिक भांडवलकर , सुयेश दळवी,साहिल चौरे, अमीर मुलाणी, जगदीश भोंडे , बंटी धिवार, सोहेल शेख, अन्सार शेख, शाहरुख मुलाणी, अमिर खान आदी उस्थितीत होते.

## काजळेश्वर येथे लोकशाहीर अन्ना भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतीथी साजरी .

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**

कारंजा तालुक्यातील ग्राम काजळेश्वर येथे ठिक ठिकाणी लोकशाहीर अन्नाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतीथी निमीत्त दोनही महान नेत्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले . जी .प .आयुर्वेदीक दवाखाना येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतीमेचे पुजन आरोग्य अधीकारी डॉ प्रशांत वाघमारे; सहकारी आत्माराम सोनोने कैलास पाटील उपाध्ये यांनी करुन त्याना विनम्र अभिवादन केले यावेळी आरोग्य कर्मचारी यांची उपस्थीती होती .ग्रामपंचायत भवन काजळेश्वर येथे उपसरपंच तैसीम भाई यांचे अध्यक्षते खाली ग्रा.प सदस्य गण; ग्रामपंचायत कर्मचारी वृंद तथा उपस्थित मान्यवरांनी उभय महामानवांच्या प्रतीमचे पुजन करून हारार्पन केले .ग्रा.पं सदस्य भोला सावळे यांनी उभय महामानवाचे जीवन पटाविषयी माहीती सांगीतली कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन वसुली अधीकारी हरीदास चौधरी यांनी केले . गावातील विवीध आस्थापणात ही लोक शाहीर अन्नाभाऊ साठे व लोकमान्य टिळकांना विनम्र अभिवादन करण्यात आले .



# ठाणे जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी पदभार स्वीकारला

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके)**

ठाणे जिल्ह्याचे कार्यक्षम जिल्हाधिकारी म्हणून ओळख असणारे अशोक शिनगारे सेवानिवृत्त(३१) होत असल्याकारणाने त्यांच्या जागी कोणत्या अधिकाऱ्याची वर्णी लागणार याची ठाणे जिल्ह्यात सर्वत्र चर्चा असतानाच,शासनाच्याकडील आदेशानुसार जालनाचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ (भा. प्र.से.) यांची वर्णी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून लागली असल्याने,आज त्यांनी मावळते जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडून ठाणे जिल्ह्याचा जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारला.

डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ हे 2016 Batch चे IAS अधिकारी असून,त्यांचे शिक्षण MBBS, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज अँड आर जे जे ग्रुप ऑफ हॉस्पिटल, मुंबई येथे झाले आहे.

त्यांच्या यवतमाळ येथील कालावधीदरम्यान यवतमाळ जिल्हा परिषदेस सन 2020-21 मध्ये यशवंतराव चव्हाण पंचायतराज पुरस्काराचे



राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक तसेच महिला बाल विकास विभागांतर्गतची आरंभ ही योजना त्यांनी यशस्वीपणे राबविल्यामुळे, त्या योजनेचे राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक मिळाले. कोवीड काळात मिशन कायाकल्प राबवून RH, PHC, Sub centre मध्येही सुधारणा केली.

त्यानंतर जालना जिल्ह्यामध्ये मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या अनुषंगाने राज्य शासन व आंदोलनकर्ते यांच्यामध्ये समन्वय व सुसंवाद साधून, संवेदनशीलपणे आंदोलनाचा कालावधी उत्तमपणे हाताळला. त्यानंतरही त्यांच्याच कार्यकाळामध्ये मुख्यमंत्री महोदयांच्या 100 days कार्यक्रमामध्ये विभाग स्तरावर जालना जिल्ह्याची निवड झाली होती. तसेच, जालना जिल्ह्यामध्ये रेशीम, Agro processing, skill development क्षेत्रांत भरीव काम केले आहे.

डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ (भा.प्र.से.) यांची ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदी निवड झाल्याने विविध स्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात असून, ठाणे जिल्ह्यातील नागरिकांच्या त्यांच्या नियुक्ती प्रती अपेक्षा वाढल्या आहेत.

## वाडा तालुक्यात महसूल सप्ताह 2025 चे आयोजन

महाराष्ट्र जीत

**वाडा:-** वाडा तालुक्यातील नागरिकांना महसूल विभागाने महसूली कामे वेळेत पूर्ण करून त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे वसुली नोटीस पाठवणे, मोजणी करणे अपील प्रकरणांची चौकशी करणे व शासकीय काम वेळेत पूर्ण करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आणि महसूल वसुलीचे उद्दिष्ट पार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्याकरिता व महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरिता महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांच्याकडील दिनांक २९/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार दरवर्षी १ऑगस्ट २०२५ हा 'महसूल दिन' साजरा करण्यात येणार आहे तसेच यावर्षी महसूल दिनापासून दिनांक १ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात महसूल सप्ताह -२०२५ साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले या महसूल सप्ताहामध्ये नागरिकांसाठी विशेष मोहीम/ कार्यक्रम/उपक्रम/शिबिर/महसूल अदालतीचे आयोजन करण्यात आलेले आहे त्या




कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे
१ ऑगस्ट- महसूल दिन साजरा करणे महसूल सप्ताह शुभारंभ
२ऑगस्ट - शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबापैकी अतिक्रमण नियमाकुल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणे
३ऑगस्ट - पाणंद/शिवरस्त्याची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे
४ऑगस्ट - छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे
५ ऑगस्ट - विशेष सहाय्य योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डिबीटी करून अनुदानाचे वाटप करणे
६ ऑगस्ट - शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमण मुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनीबाबत शासनधोरणानुसार (नियमाकुल करणे सरकार जमा करणे) निर्णय घेणे
७ ऑगस्ट - M-sand धोरणांची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणाली प्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताहाची सांगता समारंभ

तरी सर्व नागरिकांनी महसूल सप्ताह अंतर्गत समाविष्ट बाबीचा लाभ घ्यावा व माहितीसाठी आपल्या ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व तहसील कार्यालयाशी वाडा (महसूल विभाग) यांच्या कक्षेशी संपर्क करावा असे आवाहन तहसील कार्यालय वाडा यांच्या वतीने करण्यात येत आहे

## मालमत्ता थकबाकीदारांना थकबाकीदारांना यंदा अभय नाही

### कर वसुली संदर्भात प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांची आढावा बैठकीत घोषणा.

महाराष्ट्र जीत

**भिवंडी सुनील झळके**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कामांमध्ये कर उत्पन्न वाढी संदर्भात अत्यंत महत्त्वाचा वाटा समजला जात असल्याकारणाने सद्यस्थितीत भिवंडी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता नुकताच प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाग समिती १ ते ५ च्या अंतर्गत सहायक आयुक्त, कर निरीक्षक व भूभाग लिपीक यांची नुकताच महत्वपूर्ण आढावा बैठक मा.महासभा सभागृहामध्ये घेण्यात आली. सदर बैठकीस उपायुक्त (कर), व सर्व संबंधीत अधिकारी उपस्थीत होते. सदर बैठकीमध्ये मालमत्ता कर वसुलीच्या सद्य परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. मालमत्ता कर वसुली कार्यात मागे असलेल्या, ज्या लिपीकांची मालमत्ता कर वसुलीची कामगिरी अत्यंत असमाधानकारक आहे अशा कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याचे स्पष्टनिर्देश आयुक्तांनी दिले आहे तसेच चालु आर्थीक वर्षात मालमत्ता कराच्या व्याजात सुट



देणे बाबत कुठल्याही प्रकारची अभय योजना देण्यात येणार नाही असेही सूचित केले. त्यामुळे यंदा भिवंडीतील थकित करदात्यांना व्याज माफीच्या योजनेमध्ये अभय मिळणार नाही. कर वसुलीमध्ये गती आणण्यासाठी ठोस उपाय योजना करण्यावर भर देण्यात आला. मालमत्ताधारकांनी वेळेवर कर भरण्यास प्रोत्साहन मिळावे या करीता जनजागृती मोहीम राबविण्याची सुचना देण्यात आल्या. तसेच मोठ्या थकबाकीधारकांची यादी वर्तमान पत्रात तसेच चौका चौकात बॅनवर प्रसिध्द करणेची सुचना देण्यात आल्या. वसुलीची कारवाई अधिक तीव्र करण्याबरोबरच कर न भरणाऱ्यांच्या मालमत्तेच्या जप्तीची कारवाईची मोहीम सुरु करण्याच्या सुचनाही सर्व वसुली कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या तसेच आयुक्तांनी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कर्तव्यानिष्ठ कामे करुन महापालिकेच्या उत्पन्नात वाढ करण्याचे सक्त सुचना वजा आवाहन केले.

दैनिक
शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५
# महाराष्ट्र जीत
वाशीम जिल्हा


## अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर मुलाणी यांची निवड

**प्रतिनिधी शाम जगताप**

सासवड दिनांक 30 : अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर चांदभाई मुलाणी यांची निवड करण्यात आल्याची घोषणा अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी केली. सासवड येथे ट्रस्टच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ही निवड करण्यात आली. नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष विजय वढणे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले व त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आप्पासाहेब भांडवलकर, उपाध्यक्ष राजेंद्र धोत्रे, सचिव अतुल दादा पवार, सल्लागार मंगेश गायकवाड, खजिनदार इजाज पानसरे, दत्ता सूर्यवंशी, पुरंदर तालुका युवक अध्यक्ष येशू जाधव, सासवड शहर उपाध्यक्ष समिर बागवान, विलास खोमणे, चंद्रकांत भिसे, रूतिक भांडवलकर , सुयेश दळवी,साहिल चौरे, अमीर मुलाणी, जगदीश भोंडे , बंटी धिवार, सोहेल शेख, अन्सार शेख, शाहरुख मुलाणी, अमिर खान आदी उस्थितीत होते.

# सिडको मध्ये तरुणाना नोकरीची सुवर्ण संधीअविनाश जाधव वार्ताहर

**कळंबोली panvel (प्रतिनिधी):-** आज काल या जमान्यामध्ये सरकारी क्षेत्राकडे जास्त भर दिसत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातील (Corporate jobs) अनेकांचेच नोकरीचे भयावह अनुभव ऐकल्यानंतर बऱ्याच नोकरदारांनी त्यांचा मोर्चा (Government jobs) सिडको आणि तत्सम प्रशासकीय आस्थापनांच्या वळवला. पगार, पद, सुट्ट्या आणि तुलनेनं नोकरीच्या ठिकाणी असणारं सकारात्मक वातावरण या कारणास्तव आताच्या घडीलासुद्धा अनेकजण अशा आस्थापनांमध्ये विविध पदांवरील नोकऱ्यांच्या शोधात आहेत. सर्वच मंडळींसाठी CIDCO नं अखेर महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ज्याचा फायदा भविष्यात तरुण वर्गाला होताना दिसणार आहे.

**भरती प्रक्रिया कशीअसणार?**

महाराष्ट्र शासनाने गृहविकास आणि शहररचना या क्षेत्रांमध्ये भरिव योगदान देणाऱ्या सिडको महामंडळामध्ये गेल्या बऱ्याच काळापासून मनुष्यबळाचा तुटवटा जाणवत असल्यानं अखेर नव्यानं नोकरभरती प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे. नुकतीच सिडको ने या धर्तीवर 160 पदांसाठी ऑनलाईन पद्धतीनं परीक्षा पार पडली असून, यामध्ये सहायक विकास अधिकारी




आणि अभियंता संवर्गातील 130 पदांसाठीच्या ऑनलाईन परीक्षांचाही समावेश होता.

**सिडकोमध्ये रिक्त जागा किती आहेत ?**

दरम्यान सिडकोकडून येत्या काळात इतरही रिक्त पदांसाठीची भरती प्रक्रिया सुरू केली जाणार असून, टप्प्याटप्प्यानं रिक्त पदांवर नव्यानं उमेदवारांना संधी दिली जाईल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. उपलब्ध माहितीनुसार सिडकोमध्ये सध्या 2797 पदांपैकी 1619 पदं रिक्त असून त्यामुळं सेवेत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. परिणामी सातत्यानं कर्मचारी संख्या वाढवण्याची मागणी होत असल्यानं आणि कामाचा वाढता व्याप पाहता सिडकोकडून लवकरच नोकरभरती प्रक्रिया घेतली जाणार आहे. जिथं आवश्यकतेनुसार रिक्त पदांवरील भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये नवी मुंबई आणि नजीकच्या क्षेत्रांमध्ये कैक प्रकल्प सिडकोनं हाती घेतले असले तरीही त्या तुलनेत मनुष्यबळाचा आकडा मात्र अतिशय कमी असल्यामुळं भरती करणं हाच पर्याय आता सिडको अवलंबला जाणार आहे हेच स्पष्ट होत आहे.

## सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप.

**भिवंडी (सुनील झळके)**

महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ०७ कर्मचारी सेवानिवृत्त व स्वेच्छा निवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार,महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून महान पालिका सेवेतून निरोप देणेत आला. याप्रसंगी उप-आयुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे यांच्या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या. महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिस-या मजल्यावरी स्व. विलासराव देशमुख सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमामध्ये रमेश बंडु थोरात (सहा. आयुक्त शिक्षण) स्वेच्छानिवृत्त, तसेच गोपाल एस सिंह (फ़ॉर्मासिस्ट) , रतन दत्तात्रेय गोसावी, (वाहनचालक) , इम्रान सिंकंदर खतीब (वाहनचालक) , मालू धाको मोरघे (रोड मुकादम) , कैलास वाघ बाळीकराम तेलवणे (सॅ. का) , अख्तरअली मोह. शरीफ़ (सॅ. का) अशा ०७ सेवानिवृत्त व ०१ स्वेच्छानिवृत्त मनपा अधिकारी, कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

## शिवसेनेच्या वतीने कर्जमाफी सह इतर मागण्यांसाठी हणेगाव ते देगलूर पदयात्रा

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दि. ०२ आगस्ट २०२५ रोजी दूसरा श्रावण सोमवार हणेगाव ते देगलूर शेतकऱ्यांच्या कर्जमाफी सह इतर मागण्या संदर्भात हणेगाव ते देगलूर पदयात्रा सकाळी ०९ वाजता हणेगाव येथुन काढण्यात येत आहे तरी सर्व शेतकरी शेतमजूर दिनदलीत बांधवांनी पदयात्रेत उपस्थित रहावे. असे आवाहन उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर उपतालुकाप्रमुख मानाजी पाटील लोणे लोणीकर, उपतालुकाप्रमुख पुरुषोत्तम अन्सापुरे विभाग प्रमुख दिलीप महाराज इनामदार, शंकर पाटील देवकत्ते युवा सेना तालुका समन्वयक तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, सरपंच बालाजी चोपडे यांनी केले आहे या बाबतीत अधिक माहिती अशी की शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने हणेगाव ते देगलूर उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी शेतकऱ्यांना वृध्दपकाळ पेंशन योजना जाहीर करावी शेतकऱ्यांना तात्काळ २०२४ चा पिकाविमा वाटप करण्यात यावा ,. जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठ्याचे काम त्वरीत पुर्ण करण्यात यावे. देगलूर _हणेगाव देगलूर_मानुर देगलूर_मुक्राबाद आदि रस्त्याचे काम तात्काळ सूरु करावे. निराधार वृध्दपकाळ योजनेच्या अनुदानात वाढ करण्यात यावे ,दारिद्र् रेषेची अथवा २१००० /रु. उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची जाचक अट रद्द करण्यात यावी. हणेगाव येथे राष्ट्रीय कृत बँक चालू करण्यात यावी. आदी मागण्यासाठी पदयात्रा काढण्यात येत आहे, पदयात्रा शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापूरकर यांच्या नेतृत्वाखाली , व शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात येत आहे तरी शेतकरी शेतमजूर शिवसैनिक वृद्ध, युवा, मोठ्या संख्येने उपस्थितीत रहावे असे आवाहन उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

## रामजीत(जितु) गुप्ता'भारत गौरव सन्मान२०२५'पुरस्काराने सन्मानित



पुणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)समाजाचे आपण काही देण लागतो,याच उद्देशाने काही ध्येय्यवादी व्यक्तीमत्व समाजात समाजसेवा करत असतात. जनसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य घेऊन काम करणारे कार्यकुशल व्यक्तीमत्व म्हणजे रामजीत(जितु) गुप्ता सर.त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल पुणे येथील हिरकणी फाउंडेशनने घेतली.नुकताच त्यांना पुणे येथे आयोजित भव्य दिव्य समारंभात प्रतिभावंत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते"भारत गौरव सन्मान२०२५"या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.रामजीत(जितु) गुप्ता हे नेहमीच गरीब,गरजु लोकांना वेगवेगळ्या प्रकारे सातत्याने मदत करत असतात.मुलांच्या शाळेची फी भरुन त्यांना दिलासा दिला आहे.२०५विद्यार्थांना वह्या,पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य देऊन मुलांचे मनोधैर्य वाढविले आहे.रामजित(जितु) गुप्ता यांचा महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्थांशी घनिष्ठ संबंध आहेत.त्यांना भारत गौरव२०२५हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## एकंबेकर महाविद्यालयात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी.

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

देगलूर तालुक्यातील हनेगाव येथील कै.बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालयात साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी संस्थेचे कार्यवाहक प्रा. डॉ. चरण सिंग राठोड यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी ज्येष्ठ सेवानिवृत्त प्रा. डॉ. डी आर जाधव व महाविद्यालयातील ओ. एस. श्री भाऊराव पवार यांच्या हस्ते दोन्ही प्रतिमांना पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वक्ते राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. उत्तम मानवते यांनी अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या कार्यासंदर्भात मार्गदर्शन केले. व दुसरे वक्ते लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा.डॉ.आनंद शिंदे यांनी अण्णाभाऊ साठे म्हणजे साहित्याचा निखळतारा व लोकमान्य टिळक म्हणजे जहाल मतवादी लढवय्ये नेते होते.असे त्यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. उमाकांत बिरादार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. सूर्यकांत कळसकर यांनी केले तर आभार एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. कांबळे एस.एस. यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा.डॉ. पवन एमेकर,प्रा.डॉ.बालाजी




राठोड प्रा. भारत बिरादार, जयप्रकाश झमकाडे, रोहित कांबळे शिक्षकेतर कर्मचारी संतोष सूरेवाड,मारुती चव्हाण, मजकुरी मोशीन व तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णाभाऊंच्या साहित्याने स्त्रीयांना नायिकात्व देऊन वर्ग-वर्ण विषमता विरुद्धचा लढा बळकट केला : प्रा.शरद शेजवळ

**येवला,प्रतिनिधी (गोकुळ लोखंडे )**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंनी चित्रा,वैजयंता,फकीर,पिळवणूक,बैल ह्या कथा-कादंबऱ्या मधून पिळवणूक,अन्याय,अत्याचार,गुलामगिरी, शोषणा विरुद्ध महिलांना नायिका बनवलं व अण्णाभाऊंच्या साहित्याने स्त्रीयांना नायिकात्व देऊन वर्ग-वर्ण विषमता विरुद्धचा लढा बळकट केला असे उदगार लोककवी डॉ.वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिकचे संस्थापक,कार्याध्यक्ष प्रा शरद शेजवळ यांनी केले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तिभूमी सार्वजनिक वाचनालय,राष्ट्रीय महाकवी डॉ.वामनदादा कर्डक मुक्तिभूमी अभ्यासिका,भारतीय अकादमी येवला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे



यांच्या जयंती निमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रा.शरद शेजवळ बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सचिव रमेश गायकवाड होते.प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय अकादमीचे संचालक राजरत्न वाहुळ होते.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक शाहिरी जलशातून प्रेरणा घेत उभ्या राहिलेल्या कामगार,कष्टकरी, शेतकरी,शेतमजुरवर्गाच्या शोषणा विरुद्ध लाल बावटा शाहिरी कलापथकाच्या माध्यमातून आपल्या साहित्य शाहीरी कवण,गीत,छक्कड,पोवाडा,कथा, कादंबरी,लोकनाट्य,वगनाट्य ह्या सांस्कृतिक कार्यातून अण्णाभाऊ साठे परिवर्तन,सम्यक विद्रोह मांडत,गात,लिहीत राहिले असेही प्रा.शेजवळ यांनी ह्या प्रसंगी बोलताना सांगितले. भारतीय अकादमी तथा मुक्तिभूमी अभ्यासिकेचे साक्षी दौंडे,शितल वाहूळ यांनी मनोगत व्यक्त केले.रितू गोरे,स्वाती औताडे, प्रांजल पवार,प्रांजल गायकवाड, ऋतुजा राऊत,प्रियांका पवार,कोमल सोनवणे,साक्षी गायकवाड,भूमी रेंदे, राधा गरुड,नेहा केदारे,सनी गायकवाड,कार्तिक पवार, रवी गरुड, सार्थक शिरसाट, कुणाल जाधव, नवनाथ साठे,अशोक बागुल, समाधान पगारे,तेजस पगारे,आदिती मोरे,तेजस्विनी गुंजाळ, भारतीय अकॅडमीतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर वस्तीगृहातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि.अक्षय गरुड व आभार वसंत पवार यांनी मानले.

# व्यवसायातील अडथळ्यांवर तोडगा काढा

### जमीयतुल कुरेश समाजाची माहूरच्या तहसीलदारा मार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेनाद्वारे मागणी...

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**

**माहूर तालुका प्रतिनिधी**

कुरेशी समाज हा परंपरेने मांस विक्री, कत्तलखाने आणि जनावरांच्या व्यवहाराशी संबंधित व्यवसायात असलेला घटक असून, गेल्या काही काळात त्यांच्या व्यवसायासंदर्भात गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जमीयतुल कुरेश, माहूर यांच्या वतीने एक सविस्तर निवेदन मुख्यमंत्री, राज्यपाल व उपमुख्यमंत्री यांच्यासह स्थानिक प्रशासनाला सादर करून विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे कुरेशी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच व्यवसायाच्या सुरक्षिततेसाठी धोरणात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. सध्या माहूरमध्ये कायमस्वरूपी, आधुनिक सुविधांनी युक्त असा कत्तलखाना उपलब्ध



नसल्याने जनावरांची वाहतूक रस्त्यावरून करावी लागत आहे. यामुळे अनेकदा गैरसमज, अडवणूक, पोलिसी हस्तक्षेप यांचा समाजाला सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर शहरातच एक नियमित व मान्यताप्राप्त स्लॉटर हाऊस उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.जनावरांची खरेदी-विक्री करताना आवश्यक असलेली प्रमाणपत्रे व वैद्यकीय तपासणीची सुविधा पुरेशी उपलब्ध नसल्याने समाजाला अनेकदा अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे अशा सुविधा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात.काही पोलीस अधिकारी जनावरांची वाहतूक करणाऱ्या समाजबांधवांना विनाकारण अडवतात.

काही वेळा कायदेशीर कागदपत्र असूनही गाड्या जप्त केल्या जातात. ही अडवणूक थांबवून कायद्याचे पालन करणाऱ्यांना संरक्षण द्यावे, अशी मागणी आहे. गोमांस प्रकरणात गैरसमज दूर करावेत जनावरांच्या चोरीच्या खोट्या आरोपांचा बंदोबस्त करावा .या सर्व मागण्या मान्य करून समाजाच्या व्यवसायासंबंधी निर्माण झालेल्या अडचणी दूर कराव्यात, अशी स्पष्ट भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे. यावेळी निवेदनावर समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून, शासन दरबारी या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आह

यावेळी नगराध्यक्ष फ़िरोज़ कादर दोसानी माजी सभापती हाजी उस्मान साहब रामु हरिशचन्द्र जाधव संजय किशन गायकवाड हाजी अब्दुल रऊफ सौदागर रफीक सौदागर मुनाफ भाई सफराज दोसानी सय्यद रहमत अली इलियास बावाणी अजीस भाई इरफ़ान सय्यद निसार कुरैशी

रफ़ीक़ सौदागर शैख़ सज्जाद सय्यद अजीम सईद अली वसीम कुरेशि अतीक कुरेशी समद सौदगर

बाबु कुरेशी इब्राहिम कुरेशी शेख फरिद कुरेशी

कदिर कुरेशी शेख फारुक कुरेशी सलीम कुरेशी

मोहिद्दिन कुरेशी जाविद कुरेशी वली पाशा कुरेशी

रफिक कुरेशी मनान कुरेशी सरवर कुरेशीअहेमद साहब कुरेशी सत्तार कुरेशी रज्जाक कुरेशी

इस्माइल कुरेशी मोहसीन कुरेशी गनी कुरेशी

तौसिफ कुरेशी इक्बाल कुरेशी सादिक कुरेशी

वाजिद कुरेशी बब्लु मुख्तार कुरेशी जाविद कुरेशी

सोहेल कुरेशी हमीद कुरेशी जहोर कुरेशी यांचे सहसेकडून बांधव उपस्थित होते

# लेंडी कार्यकारी अभियंता यांना निलंबित करा - ॲड. इर्शाद पटेल

**देगलूर तालुका प्रतिनिधी/संघपाल मदने**



महाराष्ट्र व तत्कालीन आंध्र प्रदेश राज्याचा संयुक्त प्रकल्प म्हणून लेंडी प्रधान प्रकल्प ओळखला जातो.मात्र विविध कारणाने मागील ३८ वर्षांपासून हे प्रकल्प रखडलेले होते. प्रशासन व प्रकल्प बाधित नागरिकांच्या अटीस अधीन राहून प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले. प्रकल्पग्रस्तांकडून शासनाकडे काही मागण्या होत्या ज्यामध्ये शेतीचा सानुग्रह अनुदान असेल, वाढीव कुटुंबाचा मावेजा असेल, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकरकमी अमुक रक्कम देण्याचे असेल, प्रवास भत्ता असेल, बेरोजगारांसाठीचा मुद्दा असेल अशा विविध मागण्या प्रशासनाकडे मांडण्यात आल्या. कालांतराने मागण्या पूर्ण करण्याच्या अटीवर प्रशासनाने घळभरणीचे काम सुरू करण्याचा डाव घालून प्रकल्पग्रस्तांचे कंबरडेच मोडले. कारण वरील मागण्या अजून पर्यंत पूर्ण झालेल्या नाहीत.

अशातच लेंडी प्रधान प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील रावणगाव, हसनाळ, या गावचे पुनर्वसन खानापूर जवळील देगलूर तालुक्यात करण्यात आले. प्रशासनाकडून पुनर्वसनात १८ नागरी सुविधा पूर्ण करने बंधनकारक असते. सदरील उर्वरित कामे व क्षितीग्रस्त कामे सध्या पुनर्वसनात चालू आहेत. मात्र ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याने संबंधित विभागास पत्राद्वारे कळविण्यात आले होते. मात्र कार्यवाहीच्या अनुषंगाने कोणतीच हालचाल न दिसल्याने एडवोकेट इर्शाद पटेल यांच्या नेतृत्वात सबंध गावकऱ्यांनी एकत्रित येऊन काम बंद पाडले. काम बंद पडताच प्रशासन खळबडून जागी झाले. आणि लगेचच उपजिल्हाधिकारी यांनी स्वतः प्रत्यक्षरीत्या कामाची पाहणी केली. ज्यामध्ये त्यांना अनेक ठिकाणी कामात अनियमितता झाल्याचे दिसून आल्याचे एका चॅनलच्या माध्यमातून सांगितले. शिवाय चालू असलेल्या नाली व रस्त्याचे काम पुन्हा करण्याचे आदेश दिले. याशिवाय जिल्हाधिकारी यांनी सुद्धा घळभरणीच्या मोबदल्यात पुनर्वसनातील कामांमध्ये नो कॉम्प्रोमाइज असा शब्द वापरून सुद्धा जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांच्या आदेश व सूचनेस केराची टोपली दाखवत कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांनी गुत्तेदारासोबत मिलीभगत करीत बोगस कामांचा सपाटा लावला.ज्यातून पुनर्वसित नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाची कामे पुन्हा नव्याने करण्याच्या अटीवर कामे चालू करण्यात आली. मात्र संबंधित प्रशासन व गुत्तेदाराने आजतागायत कोणतीच कामे न केल्यामुळे दिनांक ०४ आगस्ट २०२५ रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालय देगलूर यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसत असल्याचे इर्शाद पटेल यांनी सांगितले. शिवाय जोपर्यंत उर्वरित शेतीचे सानुग्रह अनुदानातील जाचक अटी रद्द करणे, वाढीव कुटुंबाचा मावेजा, विणा अट देने, २१ वर्षे पूर्ण झालेल्यांना वाढीव कुटुंबाचा मावेजा देणे, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र परत घेऊन एकमुस्त रक्कम, शासन नियमानुसार वाहतूक भत्ता, व रोजगाराचा मुद्दा जोपर्यंत पूर्ण होणार नाही, तसेच कार्यकारी अभियंता, उप अभियंता व शाखा अभियंता लेंडी प्रधान प्रकल्प देगलुर यांना दोषी ठरवून निलंबित करण्यात येत नाही तोपर्यंत उपोषणापासून माघार घेणार नसल्याचेही एडवोकेट इर्शाद पटेल यांनी सांगितले आहे.